**ATOMIC ENERGY CENTRAL SCHOOL, ANUSHAKTINAGAR MUMBAI- 400094**

**परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय, अणुशक्तीनगर मुंबई -४०००९४**

**मराठी (Marathi-009)**

| | | |
|---|---|---|
| **वेळ : 3.00 तास** | **PT-2, 2023-2024** | **गुण : 80** |
| **Time allowed: 3.00 hours** | **STD - X** | **Maximum Marks : 80** |

---

**सर्वसाधारण सुचना :**

1. या प्रश्नपत्रिकेत - अ, ब, क, ड - असे चार विभाग आहेत.
2. सर्व विभाग आवश्यक आहेत.
3. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
4. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

## विभाग - 'अ' - वाचन व आकलन- 15 गुण

**प्रश्न 1) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

एखाद्या गोष्टीप्रती मनात भक्तीची भावना असेल तर तेथे श्रद्धा आहे असे म्हणता येते, तर एखाद्या गोष्टीप्रती मनात भीती निर्माण झाल्यास माणूस श्रद्धेकडून अंधश्रद्धेकडे खेचला जातो. श्रद्धा आणि अंधश्रद्धा या दोहोमध्ये एक पुसटशी रेषा आहे, त्यातील श्रद्धेची बाजू ही अभयातून तर अंधश्रद्धेची बाजू भयातून निर्माण होताना दिसते. आज विज्ञानावर आधारित तंत्रज्ञानाच्या मदतीने अनेक विविध बदल घडून आले आहेत. त्यामुळे संपूर्ण जगाचा कायापालट झाला आहे. तरीदेखील बहुतांश समाज आजही या अंधश्रद्धेच्या पूर्णपणे आहारी जाऊन सारासार बुद्धीचा वापर न करता मिंधा झालेला दिसतो. कोणत्याही गोष्टीमागचे सत्य समजून न घेता भितीपोटी किंवा अविचारापोटी माणूस ती गोष्ट अनुसरतो. यातून अंधश्रद्धा वाढते. एखाद्या गोष्टीकडे चिकित्सकपणे व डोळसपणे पाहिल्यास त्यामागील सत्याचा उलगडा होतो. परिणामी माणूस आंधळेपणाने दुसऱ्यांचे अनुकरण करणे थांबवतो. हीच प्रवृत्ती प्रत्येक व्यक्तीने अंगीकारल्यास प्रत्येक घडणा-या घटनेमागील कार्यकारणभाव लक्षात घेऊन त्या घटनेमागील सत्यता आपल्याला पटते. यातून अंधश्रद्धेने समाजावर बसवलेला आपला प्रभाव समूळ नष्ट होऊन या विचारांचे सावट समाजावरून पूर्णपणे दूर सारले जाऊ शकते.

**प्रश्न 1) a) उतारा वाचून त्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (कोणतेही 3). (3 x1=3)**

1. श्रद्धेसाठी काय आवश्यक आहे?

    A) नियमित तीर्थयात्रेची भावना B) दानधर्म करण्याची भावना

    C) मनात भक्तीची भावना D) मन तृप्ततेची भावना

2. माणूस अंधश्रद्धेकडे केव्हा खेचला जातो?

    A) मनात अभय असला की B) माणूस गरीब असला की

    C) अशिक्षित असला की D) मनात भय निर्माण झाला की

3. जगाचा कायापालट कशामुळे झाला?

    A) निसर्ग चक्रामुळे B) विज्ञानावर आधारित तंत्रज्ञानामुळे

    C) मनातल्या श्रद्ध भावनेमुळे D) अनुकरणामुळे

4. सत्याचा उलघडा होण्यासाठी काय आवश्यक आहे?

A) चिकित्सकपणा व डोळसपणा    B) आत्मविश्वास

C) समयसूचकता    D) प्रामाणीकपणा

**b) खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा. (कोणतेही 3). (3x1=3)**

1. सारासार बुद्धीचा वापर न केलेला माणूस कसा होतो?
2. 'कार्यकारणभाव' चा अर्थ काय?
3. श्रद्धेची बाजू ही कशातून निर्माण होते?
4. कोणता समाज बुद्धीचा वापर न करता मिंधा झालेला असतो ?

**c) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तर लिहा. (कोणतेही-1) (2x1=2)**

1. वरील उताऱ्यात अंधश्रद्धेविषयी लेखकाने काय सांगितले आहे? उताऱ्याच्या आधारे स्पष्ट करा.
2. तुम्हाला समाजात कोठे कोठे अंधश्रद्धा दिसते? ती निवारण करण्यासाठी काय काय प्रयत्न कराल, ते तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**प्रश्न- 2 खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

बाळ, चाललास रणा
घरा बांधिते तोरण
पंचप्राणांच्या ज्योतींनी
तुज करिते औक्षण.

याच विक्रमी बाहूंनी
स्वतंत्रता राखायची,
खांदयावरी या विसावे
शांति उदयाच्या जगाची.

म्हणूनिया माझ्या डोळा
नाही थेंबही दुःखाचा;
मीहि महाराष्ट्रकन्या
धर्म जाणते वीराचा.

**प्रश्न-2 a) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 3) (3 x1=3)**

1. स्वतंत्रता राखणारे बाळाचे विक्रमी-----

A. पाय    B. डोळे    C. हात    D. कान.

2. बाळाच्या खांदयावर विसावणारी .........................

A. उदयाच्या जगाची क्रांती. B. भविष्यातील जगाची शांती.

C. आजच्या जगाची शांती. D. आजची क्रांती.

3. आईचा बाळ कोठे चालला आहे?

A. धावायला B. गावाला C. विदेशात D. युद्धावर

4. आई स्वतःला कोणती कन्या म्हणवून घेण्यात धन्यता वाटते?

A. कर्नाटक B. हिंदू C. महाराष्ट्र D. धर्मकन्या

**प्रश्न-2 b) कवितेच्याच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 4).** **(4x1=4)**

1. आई कोणत्या ज्योतीने बाळाचे औक्षण करते?

2. बाळाचे औक्षण आई का करते?

3. आई कोणता धर्म जाणते?

4. बाळाचे हात कसे आहेत असे आईला वाटते?

5. आपल्या देशाचे स्वातंत्र्य आबाधित राखण्याचे काम कोणाच्या खांद्यावर असते?

**विभाग - 'ब' - व्याकरण - 20 गुण**

**प्रश्न 3. a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4)** **(4×1 =4)**

1. खालीलपैकी विशेषनामाचा योग्य पर्याय कोणता ?

(A) मुलगा B) हिमालय C) पर्वत D) नदी

2. खालीलपैकी योग्य विधाने कोणती ?

अ) विशेषण म्हणजे नामाची विशेषता दाखवणारा शब्द होय.

ब) शब्दयोगी अव्यय म्हणजे दोन शब्द किंवा दोन वाक्यांना जोडणारा शब्द होय..

क) क्रियाविशेषण म्हणजे क्रियापदाची विशेष माहिती सांगणारा शब्द होय .

ड) सर्वनाम म्हणजे क्रियापदाऐवजी येणारा शब्द होय.

A) विधान 'अ' आणि 'क' बरोबर

B) विधान 'ड' बरोबर

C) विधान 'ब' बरोबर

D) विधान 'अ', 'ब', 'क' बरोबर

3. खालील वाक्यात शब्दयोगी अव्यय कोणते?

देशासाठी वीरांनी प्राणार्पण केले.

A) केले B) प्राणार्पण C) वीरांनी D) देशासाठी

4. खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्ययाचा पर्याय वापरा.

गणित या विषयाचे आकलन मला चांगले होते,---- मला वर्गात सर्वात जास्त गुण मिळाले.

A) की B) आणि C) किंवा D) म्हणून

5. वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

आज बाबा ऑफिसमधून <u>लवकर</u> आले.

A) क्रियाविशेषण अव्यय B) विशेषण C) केवलप्रयोगी अव्यय D) क्रियापद

**b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(3×1 =3)**

1. आईने फुले तोडली. - वाक्याचा काळ ओळखा.
2. दादा परीक्षेची तयारी करतो.- भूतकाळातील वाक्य तयार करा.
3. आमची आजी मधुर गीत गायची.- वर्तमानकाळातील वाक्य बनवा.
4. शिक्षक आम्हाला इतिहास शिकवतात.- भविष्यकाळातील वाक्य बनवा.

**c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(3×1 =3)**

1. विशाखा ही अभ्यासात खूप हुशार आहे. - उद्गारार्थी वाक्य बनवा.
2. अरे ! मोठ्यांचा मान नको का ठेवायला? - विधानार्थी वाक्य बनवा..
3. कासव हळूहळू चालतो. प्रश्नार्थक वाक्य बनवा.
4. मला मोर हा पक्षी सर्वात जास्त आवडतो. नकारार्थी वाक्य बनवा.

**d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1 =2)**

1. खालीलपैकी अनेकवचनी शब्द कोणता?

A) दोरी B) वेली C) बशी D) फुलदाणी

2. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.

एका खोलीची <u>खिडकी</u> खुली होती.

3. 'सवलती' या शब्दाचा एकवचनी शब्द लिहा.

**प्रश्न 3. a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1 =2)**

1) खाली दिलेल्या पर्यायातून भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा.?

A) मासा B) वृद्धा C) पाहूणा D) दास

2. लिंग विचारानुसार गटात न बसणारी जोडी ओळखा.

A) पक्षी-पाखरू B) माता-पिता C) साहेब - साहेबीन D) ताई - दादा

3. पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता?

A) मित्र B) उंदीर C) थोरली D) लाडका

**b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1 =2)**

1. खाली दिलेल्या पर्यायातून समानार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती??

A) कनवाळू - दयाळू B) बेत - बेट C) शेक - गार D) आयुष्य - मरण

2 .'लोणी' या समानार्थी शब्दाचा योग्य पर्याय नसलेला शब्द ओळखा.

A .नवनीत B .तूप C .दुध D .मलाईत

3. खाली गटात न बसणारा शब्द कोणता?

A .पान B .पुष्प C .कुसुम D .फूल

**c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) (2×1 =2)**

1. खाली दिलेल्या पर्यायातून विरुद्धार्थी शब्दाचा पर्याय नसलेली जोडी ओळखा.?

A) वर्णनीय - अवर्णनीय B) मान - सन्मान

C) आस्था - अनास्था D) उपकार- अपकार

2. ' दारिद्र्य' या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.

A) गरिबी B) श्रीमंत C) सान D) अमिरी

3. 'वर' या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.

A) वधू B) खाली C) वरदान D) नवरदेव

**d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) (2×1 =2)**

1. ‘नवरात्र’ या सामासिक शब्दाच्या समासाचा खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

A) अव्ययीभाव B) इतरेतर द्वंद्व C) वैकल्पिक द्वंद्व D) द्विगु

2. खालील शब्दाचा समास ओळखा.

धर्माधर्म

A) अव्ययीभाव B) इतरेतर द्वंद्व C) वैकल्पिक द्वंद्व D) समाहार द्वंद्व

3. जेव्हा समासातील पहिले पद अव्यय असून ते प्रधान असते व सामासिक शब्द क्रियाविशेषण असतो तेव्हा त्या समासास -------- समास म्हणतात.

A) अव्ययीभाव B) इतरेतर द्वंद्व C) द्विगु D) समाहार द्वंद्व

## विभाग - क पाठ्यपुस्तक आधारित गुण 30

**प्रश्न-5-a) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही -3) (1x3-3)**

1. शाल’ या पाठात नारायण सुर्वेचा उल्लेख काय म्हणून आला आहे?
2. कोणत्या विचाराने लेखकाची झोप उडाली?
3. अमरावती येथील तपोवन कोणी निर्माण केले?
4. सुमित कोणते शिक्षण घेत होता?
5. शिक्षणाविषयी डॉ. माशेलकरांच्या आईचे मत काय होते?

**b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही-3) (3x1=3)**

1. मिळालेल्या भिकेत भिकाऱ्याला काय महत्वाचे वाटते?

a. खूप शाली विकत घ्याव्या b. एखादे घर विकत घ्यावे .

c. नवे नवे कपडे विकत घ्यावे d. पोटाची आग बुझवावी .

2.. खालीलपैकी सडपातळ नसलेली भाजी कोणती?

a. शेवग्याच्या शेंगा b. भेंडी c. चवळीच्या शेंगा d. कॉलिफ्लॉवर

3. कासार अब्दुल दरवर्षी न चुकता संक्रांतीला स्त्रियांना बांगड्या भरायला कुठे जायचा?

a. गावोगावी
b. स्वतःच्या दुकानात बसायचा
c. तपोवनातील कुष्ठरोगी स्त्रियांकडे जायचा
d. दाजी साहेबांच्या घरी जायचा

4. फूटप्रिंट्स ही कथा कोणत्या कथाप्रकारात मोडते?

a. साहसकथा
b. पौराणिक कथा
c. विज्ञानकथा
d. ग्रामीण कथा

5. लेखकाचा नामांकित हायस्कूलमधला प्रवेश का होऊ शकला नव्हता?

a. प्रवेश फीचे पैसे नव्हते
b. त्यांना चांगले गुण नव्हते
c. प्रवेश फीची व्यवस्था उशिरा झाली
d. लेखकाला काही येत नव्हते.

**(c) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ४० ते ५० शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही-1) (1x2 =2)**

1. भिक्षेकऱ्याने केलेला शालीचा उपयोग', याविषयी तुमचे मत लिहा.
2. पाठातील तुम्हांला सर्वांत आवडलेला विनोद कोणता? तो का आवडला ते स्पष्ट करा.
3. 'रस्त्यांना कोणी भेटलं तर सांगू नका तपोवनात जातो म्हणून, असे शन्नु का म्हणाली?
4.'ग्लोबल वार्मिंगचे दुष्परिणाम पाठाच्या आधारे स्पष्ट करा.
5. 'आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते', हे विधान तुमच्या स्वानुभवाने स्पष्ट करा.

**(d) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांमधील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा. (5x1= 5)**

(गौरव वाटणे, अंगाचा तिळपापड होणे, गलका करणे, प्रवृत्त करणे, छत्र हरपणे, अंगावर काटा उभा राहणे)

1. प. जवाहरलाल नेहरू लहान मुलांच्या नजरेस पडले की त्यांना भेटण्यास ते एकच कल्ला करत.
2. भर सभेत बाबांचा अपमान झाला तेव्हा त्यांचा राग अनावर झाला होता.
3. आताही अजगर नजरेसमोर आला की खूप भीती वाटते.
4. आई-बाबाला अभिमान वाटावा असे काम त्यांच्या सुहास मुलाने केले.
5. प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या मुलाला उच्च शिक्षण घेण्यास भाग पाडले पाहिजे.

**प्रश्न 6-a) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या. (कोणतेही-4)**

**(4x1=4)**

1. 'अंकिला मी दास तुझा' या अभंगाचे कर्ते कोण?
2. पंजाबात जाऊन भागवत धर्माची पताका कोणी फडकवली?
3. कवी 'दोन दिवस' या कवितीत किती दिवसाचा हिशोब मांडताहेत?
4. 'उन्हाळे' या शब्दाचा नेमका अर्थ काय?
5. कवींनी भाकरीला कशाची उपमा दिली आहे?
6. अभंगामध्ये संत नामदेवांनी कोणाची याचना केली आहे?

**b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही4)(4x1=4)**

1. आगीपासून बाळाला वाचवण्यासाठी चिंतेत कोण आहे?

a. हरिणी
b. आई
c. पक्षिणी
d. धेनु

2. वनवा कोठे लागला आहे?

a. झाडावर b. मेघामध्ये c. जंगलात d. डोंगरात

3. 'अंकिला मी दास तुझा' असे नामदेव महाराज कोणाला म्हणतात?

a. आईला b. परमेश्वराला c. चातकाला d. वासराला

4. डोईवरचे उन्हाळे याचा अर्थ......

a. दुपारचा सूर्य b. कठीण दिवस c. डोक्यावरचे पांढरे केस d. सुखाचे दिवस

5. कवीचे हात कोणाकडे गहाण राहिले?

a. श्रीमंतांकडे b. सोनाराकडे c. दारिद्र्याकडे d. लेखनीकडे

**c) खालीलपैकी काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. (कोणतेही - 1) (1x3=3)**

1. सवेंचि झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।।
2. झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
   दोन दिवस वाट पाहण्या त गेले; दोन दु:खात गेले. ।।

**प्रश्न- 7a) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही - 3) (1x3=3)**

1. डॉ. अनिल काकोडकर यांनी 'मोठे होत असलेल्या मुलांनो' हे पत्र कोणास लिहिले?
2. कुठल्याही मोठ्या कामाची सुरुवात असंख्य कोणत्या कामांमधून होत असते.
3. कोणती सवय ठेवली तर कामे चांगली (नीट) होतात?
4. 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर'चे लघुरूप काय?

**प्रश्न- 7-b) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ४० ते ५० शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही -1 ) (1x2=2)**

1. डॉ. अनिल काकोडकर यांनी लिहिलेल्या पत्रातून मुलांना कोणता संदेश मिळेल?
2. मेटलायाझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत, असे तुम्हाला वाटते?

**विभाग-ड लेखन -गुण 15**

**प्रश्न- 8-a) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २००-२५० शब्दांत निबंध लिहा. (1x6=6)**

1. निसर्ग आपला गुरु

मुद्दे :

निसर्ग व मानव यांचा संबंध ---- निसर्गातील प्रतिके ----- नदी, समुद्र, आकाश सूर्य झाडे, पशू पक्षी, माणसाला प्रसन्न करतात ------निसर्ग आपल्याला जगवतो ----- निसर्ग समतोल साधतो ---- संरक्षणाची जबाबदारी ----- मानवाचे कर्तव्य

किंवा (OR)

2. शाळा बंद पडल्या तर ................!

मुद्दे :

शाळेविषयीची तुमची भावना ------- शाळा म्हणजे बंधने / शिक्षा ------शाळा बंद झाली तर ---------आनंदाचे गुब्बारे फुटणे----------मनाला हवे ते करावे वाटणे -------भानावर येणे --------रम्य ती शाळा -------- शिकण्याची मजा ---------संस्कार मिळतात --------- नुकसान होईल --------माणूसपण निघून जाईल.

किंवा (OR)

3. मी शेतकरी बोलतोय ..!

मुद्दे :

जन्म----परिचय-----शेती हा पारंपारिक व्यवसाय----शेतात राबणे----देशासाठी योगदान--- जनतेचे भरण, पोषण------आज शेती न परवडणारी बाब-----बी-बियाणे, खते, औषधी महाग----शेती उत्पादनास भाव नाही----कर्जाचा डोंगर----जगणं असह्य---आत्महत्येस प्रवृत्त ---सरकारचे दुर्लक्ष --------- सरकारकडून अपेक्षा

**b) दिलेल्या मुद्यांच्या आधारे कथा लिहा. कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा. (कोणतेही-1) (1x5=5)**

अनाथ मुलगा ----------- रोज सकाळी वर्तवमान पत्रांचे वाटप ------------ दपुारी शाळेत जातांना रस्त्यात एक पाकेट पडणे ----------- वर्ग-शिक्षकाकडे देणे ------------------ पाकेटवर नाव व पत्ता ------ पोलीस चौकीत देणे --------------- योग्य व्यक्तीस पाकेट मिळणे---------------- मालकाला आनंद ------ मुलाला शाबासकी, बक्षिस------------- त्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे------------ तात्पर्य

किंवा (OR)

एक राजा राज्यातील --------लोक आळशी -------त्यांना उद्योगी बनवण्याचा विचार------- रस्त्यात मोठा दगड ठेवणे------------ खाली लहानशी पिशवी ठेवणे----------- अनेक लोकांचे बाजूने जाणे ----------पण दगड बाजूला न ठेवणे------------ एक गरीब माणूस दगड बाजूला करतो--------- पिशवी मिळते---------- त्यात सोन्याची नाणी-------- बाजूला 'बक्षीस अशी चिठ्ठी--------- बाकीच्या लोकांना पश्चात्ताप------------- लोक उद्योगी बनतात.

**c) खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणतेही -1)** (1x4=4)

रंजन / रंजना झाडे, दामोदर कालोनी' दादर रोड, मुंबई येथून, 'नगराध्यक्ष' मुंबई महानगरपालिका, यांना शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याचे तक्रारपत्र लिहितो / लिहिते.

किंवा (OR)

चेतन / चेतना पांडे, शाळा ग्रंथालय प्रतिनिधी, सरस्वती विद्यालय बजाजनगर पुणे येथून, आरण्यके बुकडेपो इतवारी नागपूर. यांना ग्रंथालयाकरीता पुस्तके मागवणारे पत्र लिहितो / लिहिते.

---